संस्थापक - नाट्याचार्य कृष्णाजी प्रभाकर खाडिलकर

नवाकाळ

रोखठोक बेधडक

संपादकीय.....

॥ न मे भक्त : प्रणश्यति ॥

# आधुनिक महाभारतातले ४० कोटी अभिमन्यू

कुटुंबाची अतिशय नाजूक किंवा हलाखीची आर्थिक स्थिती देशातल्या ४० टक्के तरुणांना आपले स्वप्न साकार करू देत नाही. वय वर्षे १० ते १८ या वयोगटातल्या जवळपास ४० टक्के तरुणांना आपल्या ऐन तारुण्यात खूप मोठी भरारी घेण्याची इच्छा असते. अधिक चांगले शिक्षण घ्यावे. अधिक चांगल्या रोजगाराच्या संधी मिळाव्यात. आपल्या आवडत्या क्षेत्रात जाता यावे. स्वत:कडे असलेले कौशल्य कला, छंद, नैपुण्य जोपासता यावे, स्वत:च्या गुणवत्तेच्या जोरावर चांगले करिअर करता यावे अशी स्वप्ने पाहणाऱ्या तरुणांना कुटुंबाची आर्थिक परिस्थिती आणि अपुऱ्या संधीमुळे नाइलाजाने मिळेल ती नोकरी स्वीकारावी लागते किंवा रोजगार करावा. विशेष म्हणजे अगदी पदवीधर झालेला तरुणांवर नाइलाजाने साधी मजूर किंवा कामगाराची कामे करण्याची वेळ येते. अशा प्रकारचा निष्कर्ष अलीकडे देशाच्या जनगणना विभागाने प्रकाशित केलेल्या आकडेवारीवरून समोर आला आहे. याचा अर्थ आपल्या देशातल्या युवाशक्तीचा किंवा अतिशय महत्त्वाच्या मनुष्यबळाचा योग्य तो उपयोग होत नसल्याचे स्पष्ट होते. देशाच्या एकूण लोकसंख्येपैकी ४० टक्के तरुणांची संख्या असलेल्या देशाने यापूर्वीची आपली अनेक वर्षे नियोजन न केल्यामुळे वाया घालविली. त्या गैरकारभाराचे फळ सामान्य जनतेला भोगावे लागत आहे. कोणत्याही देशाची प्रगती विकास हा तिथल्या मनुष्यबळाचा कसा आणि किती वापर होतो यावर अवलंबून असते. देश जगात लोकसंख्येने सर्वांत मोठा मानला जातो पण तिथल्या मनुष्यबळाचा युवकांमधल्या गुणवत्तेचा पुरेसा वापर केला जात नाही. आज चीनने आर्थिक क्षेत्रात जोरदार मुसंडी मारली आहे. याचे सर्वांत मोठे कारण म्हणजे तिथल्या तरुणांना उद्योगाची भरपूर संधी उपलब्ध करून दिली जाते. एवढेच नाही तर तरुणांमधल्या कला-गुणांचा नैपुण्याचा कौशल्याचा देशासाठी जास्तीत जास्त वापर केला जातो अगदी खेळांमध्येसुध्दा तिथल्या तरुणांना सर्व प्रकारचे प्रशिक्षण दिले जाते. कौशल्य आणि गुणवत्ता हेरण्याचे विशेष उपक्रम राबवले जातात, त्या खेळाडूंमधली निष्ठा आणि नैपुण्य वाया जाऊ देत नाहीत. केवळ आर्थिक कारणांवरून गरिबीमुळे तिथली मनुष्यशक्ती वायफळ जाऊ देत नाहीत. आज भारताला त्यांच्याकडे असलेल्या त्या प्रचंड युवाशक्तीच्या नियोजनाची गरज आहे. सरकारच्या जनगणना विभागाने देशातल्या युवाशक्तीची किंवा तरुणवर्गाची केवळ आर्थिक परिस्थितीमुळे कशी कोंडी होत आहे हे आकडेवारीनिशी दाखवून दिले आहे.

### मनासारखा रोजगार नाही

वय वर्षे १० ते १७ या गटातल्या तरुणांना परिस्थितीशी तडजोड करून पैसे कमावण्याचा मार्ग स्वीकारावा लागतो असे सप्रमाण सिध्द केले आहे. जे वय जीवनात काहीतरी नवे वैशिष्ट्यपूर्ण काम करून दाखवण्याचे असते. त्या वयात नाइलाजाने काहीतरी करण्याची वेळ तरुणांवर यावी हे खरेतर दुर्दैवच म्हटले पाहिजे. विशेष म्हणजे हे प्रमाण २५-३० टक्के असते तर त्याचे फारसे वाईट वाटले नसते. परंतु तब्बल ४० ते ५० टक्के तरुणांना आपले मन मारून आवड नसलेल्या क्षेत्रात किंवा योग्य ती संधी न मिळाल्याने पैसे मिळविण्याचा मार्ग स्वीकारावा लागतो. हे सर्वस्वी या तरुणाईचा अपमान करणारे आहे. सरळसरळ देशाच्या ४० टक्के युवाशक्तीवर अन्याय करणारे ठरते. आज भारताची लोकसंख्या सव्वाशे कोटीच्यावर आहे त्यापैकी ४० ते ५० कोटी जर तरुण असतील तर एवढे मोठे मनुष्यबळ तितक्याच मोठ्या कल्पकतेने उपयोगात आणण्याची मोठी जबाबदारी सरकारवर येऊन पडते. एकीकडे नवे पंतप्रधान नरेंद्र मोदी याच युवकांना विविध प्रकारची संधी देण्याची इच्छा व्यक्त करतात. परंतु याबाबतच्या ठोस उपाययोजना मात्र दिसत नाहीत. त्यांनी अलीकडेच गुणवत्ता किंवा कौशल्य विकास नावाचा एक आगळावेगळा उपक्रम सुरू केला आहे. मेक इन इंडिया या उपक्रमाशी तो जोडला जाऊ शकतो. देशातल्या उद्योगांमध्ये कौशल्य आणि दर्जेदार उत्पादन या दोन गोष्टींना प्रोत्साहन देण्याची त्यांची कल्पना आहे. 'मेक इन इंडिया' हा उपक्रम आणखी चांगल्या पध्दतीने विकसित करायचा असेल तर भारतातल्या तरुणाला त्याच्या स्वप्नांतातला किंवा मनातला व्यवसाय उद्योग नोकरी करण्याची संधी दिली गेली पाहिजे. जनगणना विभागाच्या अहवालाप्रमाणे पदवीपर्यंत शिक्षण घेतलेले ४० टक्के तरुण नाइलाजाने ग्रामीण भागात शेती आणि त्याच्याशी संबंधित उद्योगात मजुरीचे काम करतात. म्हणजे शिक्षण घेऊनही त्यांच्या कौशल्याचा, बुध्दीचा योग्य तो उपयोग ते करू शकले नाहीत. परिस्थितीने त्यांना पुढे जाण्याची सोयच ठेवली नाही. आपण शिकावे आपल्याबरोबर कुटुंबाची आर्थिक परिस्थिती सुधारित पिढ्यान्‌पिढ्या अडकून पडलेल्या चक्रव्यूहातून बाहेर पडावे, अशी खूप मोठी अपेक्षा या तरुणांमध्ये असते.

### महागडे शिक्षण अपुरा रोजगार

महागडे शिक्षण, अपुरा रोजगार आणि इच्छा असून न मिळालेली संधी अशा कारणाने देशातल्या ५० टक्के तरुणांचे उच्च ध्येय साकार करण्याचे स्वप्न प्रत्यक्षात येऊ शकत नाही. केवळ नाइलाजाने त्यांना या हलाखीला परिस्थितीमुळे शरण जावे लागते. त्यांच्या मनाविरुध्दच्या घटनांमुळे त्यांच्यात नैराश्य निर्माण होते. खूप काही मिळविण्याची इच्छा, जिद्द असतांना भारताला ४० टक्के तरुणांना गमवावेच लागते. या अतिशय क्लेषकारक परिस्थितीचा विचार झाला पाहिजे. डोळ्यात झणझणीत अंजन घालणारी ही आकडेवारी तरुणांच्या अन्यायाला वाट करून देणारी ठरली पाहिजे. या आकडेवारीवरून आणखी एका गोष्टीवर प्रकाश पडतो ती म्हणजे भारतातली गरिबी कमी का होत नाही. देशातल्या तरुण वर्गाचा विचारच होतांना दिसत नाही. त्याला त्याच्या बुध्दिमत्तेचा त्याच्या इच्छेप्रमाणे वापरच करू दिला जात नाही, मग स्वाभाविकपणे देशातील जी काही ठरावीक उद्योग घराणी आहेत, जे काही श्रीमंत आहेत तेच पुन्हा पुन्हा आपले आर्थिक किंवा उद्योगांचे साम्राज्य विस्तारत राहतात आणि म्हणूनच गरिबीचे दुष्टचक्र भेदू न शकणारे हे ४० कोटी तरुण अभिमन्यू ही आधुनिक महाभारताची नवी शोकांतिका आहे असे म्हणण्याशिवाय पर्याय उरत नाही. जनगणना विभागाच्या आकडेवारीचा सखोल अभ्यास झाला पाहिजे.